Lokneta News - लोकनेता न्युज

महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

मंगळवार दि.१२ मे २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २६५ | किंमत २ रुपये | 7499615933

# किनवट ते येवतमाळ मार्ग जाणारे.. मांडवी-पारवा-घाटंजी यवतमाळ-आदिलाबाद रेल्वे मार्गाची मागणी करण्याची गरज

## या रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी मांडवी परिसरातील राजकीय पुढाऱ्याची कर्तव्य शून्य कामगिरी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मांडवी । डॉ.भारत उद्धव राठोड**

वर्धा यवतमाळ नांदेड या नवीन रेल्वे प्रकल्पच्या अनुषंगाने प्रस्तावित रेल्वे मार्ग किनवट ते यवतमाळ या रेल्वे मार्गामुळे मांडवी परिसरातील शेती, उद्योग, व्यापार व पर्यटन, शिक्षण आणि आरोग्य या सर्व क्षेत्रांमध्ये मोठा बदल होऊ शकतो. मांडवी परिसरातील शेतकऱ्यांचा रेल्वे प्रकल्पमुळे पर्यटन, धार्मिक श्रद्धा, शेती आणि सीमावरती भागातील व्यापारासाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरू शकतो व विकासास गती मिळू शकते या अनुषंगाने हा रेल्वे प्रकल्प काळाची गरज आहे असे दिसून येत आहे.यवतमाळ

रेल्वे धावणे हे चैनीची नाही ही फक्त खरी कहाण्याची हरज आहे. हा लढा फक भविष्यासाठी महत्त्वाचा ठरत असल्याने याचे महत्व या राजकीय पुढारी यांना कधी समजणार आहे.आपल्या लढा फक रेल्वेसाठीच नाहीतर महत्त्वाचा ठरत असल्याने याची जाणीव राजकीय पुढारी यांना कधी होणार आहे. असे वैचारिक दारिद्र असलेले राजकीय पुढारी मांडवी परिसरातील जनतेस

प्रस्तावित रेल्वे मार्ग: यवतमाळ ते किनवट (Proposed Railway Route: Yavatmal to Kinwat)

उनकेश्वर


एकूण अंतर: २४४ किमी १४४ KM Total

मिळालेले आहे. हे आप आहे की गरज असा प्रश्न निर्माण होतो. या रेल्वे प्रकल्पाच्या उदासीनतेमुळे स्वरगीय माजी केंद्रीय महसूल मंत्री उत्तमराव राठोड यांची उणीव जनतेस होत असून त्याचा वारसा समोर नेणारा एकही राजकीय पुढारी ठामपणे उभा होत नाही याची खंत दिसून येत आहे.

किनवट पिंपळगाव मांडवी उकेश्वर पारवा – घाटंजी यवतमाळ हा रेल्वे प्रकल्प प्रस्तावित असून अंतर १४४ कि.मी. आहे. प्रशासकीय नियमानुसार हा रेल्वे मार्ग डोंगराळ भागातून जात असल्यामुळे अडचण निर्माण होत आहे पण

महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी ३०० ते ४०० कि.मी. पर्यंतच्या मार्ग हे माळपोखरून रेल्वे मार्ग निर्माण केली जाते जसे की बीड शहरास माळरानवर रेल्वे पोहचते ते तेथील राजकीय इच्छाशक्ती मुळे पण फक्त १५० कि.मी. मधील १०.कि.मी. मार्ग पोखरु रेल्वेमार्ग निर्माण केल्या जाऊ शकत नाही का अशा प्रश्न निर्माण होतो.

हा प्रस्तावित यवतमाळ किनवट रेल्वे मार्ग निर्माण झाल्यात मांडवी परिसरातील तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील कापूस बाजार भावाचा मोठा फायदा होईल व मांडवी परिसरातील शेतकरी कापसाचेपीक मोठ्या प्रमाणात घेतले जात असते त्याच्यामुळे शेतकऱ्यांना फायदा या रेल्वेमुळे मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. तसेच या प्रस्तावीत रेल्वे मार्गामुळे पर्यटनास चालना होईल.कारण मांडवी परिसरातील किनवट घाटांपासून तर घाटंजी पर्यंत या रेल्वे मार्गावर टिपेवर अभयारण्य असल्यामुळे या रेल्वे मार्गाने पर्यटन व सांस्कृतिक संधी निर्माण होऊन परिसरातील बेरोजगारास काम मिळेल. तसेच दळणवळणाला चालना मिळेल हा भाग दुर्लक्षित घटकातील असल्यामुळे रेल्वे मार्ग वाहतूक सोपी झाली तर स्वस्त प्रमाणात वाहतूक व सुरक्षित वाहतूक निर्माण होऊन परिसरातील आरोग्याचा प्रश्न मिटल्या जाईल माळ ते या मार्गे परिसरातील अनेक पेशंट हे रोज यवतमाळ आरोग्य तपासणीसाठी जात असतात त्याच्यासाठी हा रेल्वेमार्ग सोईने पर्यायाने देशाचा विकास होईल. त्यामुळे प्रस्थापित प्रशासकीय व राजकीय पुढाव्याने पुढाकार घेऊ नवीन प्रस्ताव दिलास रेल्वे मार्ग अस्तित्वात येईल.




# 'दैनिक लोकनेता'च्या वृत्ताची दखल; हिमांशु नामवाड यांच्या इशाऱ्यानंतर उड्डाणपुलाच्या कामात सुरक्षेला प्राधान्य!

> नागरिकांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. उड्डाणपुलाचे काम होत असताना सामान्य माणसाला त्याचा त्रास होऊ नये यासाठी आम्ही कटिबद्ध होतो आणि आहोत. – हिमांशु आशिष नामवाड नगरसेवक, गडचांदूर





दैनिक लोकनेता

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

### उड्डाणपुलाचं काम की मृत्यूचा सापळा? गडचांदूरकरांचा जीव धोक्यात; नगरसेवक हिमांशु नामवाड यांचा आंदोलनाचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

कोरपना । पावन देरकर

गडचांदूर शहरातील मुख्य चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप होत आहे. कामाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या उंच लोखंडी पत्र्यांमुळे वाहनधारकांना समोरून येणारी वाहतूक दिसत नसल्याने अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषतः चौकात वळण घेताना किंवा रस्ता ओलांडताना दुचाकीस्वार, चारचाकी चालक आणि पादचारी यांना मोठी कसरत करावी लागत आहे. जड वाहनांची अचानक समोरासमोर धडक होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

दरम्यान, नगरसेवक हिमांशु नामवाड यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन कंत्राटदार कंपनी *'विद्या इन्फ्राबिल्ट'*च्या व्यवस्थापकाला चांगलेच धारेवर धरले. लोखंडी पत्र्यांमुळे चालकांना अक्षरशः अंदाजाने वाहन चालवावे लागत आहे. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास येथे कधीही भीषण अपघात होऊ शकतो, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी त्यांनी बंद पत्र्यांऐवजी जाळीदार नेट शेड लावण्याची मागणी केली. त्यामुळे समोरील वाहतूक स्पष्ट दिसेल आणि अपघाताचा धोका कमी होईल, असे त्यांनी सांगितले. सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने बदल न केल्यास जनतेच्या सुरक्षेसाठी तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा थेट इशारा नगरसेवक हिमांशु नामवाड यांनी प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार कंपनीला दिला आहे.

09 May 2026 - Page 2 | dainiklokneta.in

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**कोरपना । पवन देरकर**

गडचांदूर शहरातील मुख्य चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. कामाच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या उंच लोखंडी पत्र्यांमुळे समोरील वाहतूक दिसत नसल्याने वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती.

या गंभीर परिस्थितीवर दैनिक लोकनेता न्यूज पेपरने सविस्तर वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर नगरसेवक हिमांशु नामवाड यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देत संबंधित कंत्राटदार कंपनीला तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. नागरिकांच्या सुरक्षेसाठी धोकादायक लोखंडी पत्रे तातडीने हटवून त्या ठिकाणी जाळीदार नेट शेड बसवण्याची मागणी त्यांनी ठामपणे मांडली होती.

नगरसेवक हिमांशु नामवाड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासन आणि कंत्राटदार कंपनीने तात्काळ उपाययोजना केल्या आहेत. आता त्या ठिकाणची लोखंडी पत्रे हटवण्यात आली असून पारदर्शक सुरक्षेची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांना समोरील वाहतूक स्पष्ट दिसू लागली असून अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

या बदलामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या दैनिक लोकनेता न्यूज पेपरच्या वृत्ताची शहरात चर्चा होत आहे.

# नांदेड येथे बंगाली एकता असोसिएशनच्या वतीने रवींद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या सराफा मार्केट किल्ला रोड येथे आज दिनांक ९ मे रोजी बंगाली एकता असोसिएशन च्या वतीने रवींद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात रवींद्रनाथ टागोर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली यावेळी सुमित्र, सुमित्रकार, भास्कर, सपन, संजय, अमित, रंजन, शेख मराफत यासह अनेक बंगाली एकता असोशियन सदस्य व नागरिक त्या संख्येने उपस्थित होते.

# कॉँग्रेस केवळ खोटेपणाचे आणि विश्वासघाताचे राजकारण करते-पंतप्रधान नरेंद्र मोदी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई (वृत्तसंस्था)**


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी म्हटले की, काँग्रेस फक्त खोटेपणा आणि विश्वासघाताचे राजकारण करते. काँग्रेसच्या सत्तेच्या पुस्तकात सुशासनाचा कोणताही अध्यायच नाही. त्यांनी म्हटले की, देशाची जनता स्थैर्य, विकास आणि राष्ट्रनीतीच्या बाजूने उभी आहे आणि याच कारणामुळे भारतीय जनता पक्ष तसेच एनडीएला सातत्याने जनसमर्थन मिळत आहे.

पंतप्रधानांनी ही बाब कर्नाटकातील बेंगळुरू येथे एका जाहीर सभेत सांगितली. मोदी म्हणाले की, काँग्रेस स्वतःही खोटी आहे आणि तिच्या हमीदेखील खोट्या आहेत. त्यांनी आरोप केला की, कर्नाटकात गेल्या तीन वर्षांपासून जनतेच्या समस्या सोडवण्याऐवजी सरकारचा बहुतांश वेळ अंतर्गत कलहात गेला आहे. त्यांनी म्हटले की, राज्यात मुख्यमंत्री किती दिवस राहतील आणि कुणाला संधी मिळेल हे देखील ठरवता येत नाही.

पंतप्रधानांनी काँग्रेसला परजीवी पक्ष ठरवत म्हटले की, ती आपल्या सहयोगी पक्षांसोबतही विश्वासघात करते. त्यांनी तमिळनाडूमधील काँग्रेस आणि एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुकच्या संबंधांचा उल्लेख करत म्हटले की, अनेक वर्षे जुनी आघाडी असूनही काँग्रेसने सत्तेच्या लालसेपोटी आपल्या सहयोगी पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसला.

मोदी म्हणाले की, भाजप सरकारांसाठी लोककल्याण सर्वोच्च आहे आणि त्यांचा मंत्र सबका साथ, सबका विकास हा आहे. त्यांनी म्हटले की, भाजपचे मॉडेल हे सुशासनाचा मॉडेल आहे, त्यामुळे जनता विविध राज्यांमध्ये भाजपला दुसऱ्यांदा आणि तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी देत आहे, तर काँग्रेसची राज्य सरकारे पुन्हा सत्तेत येण्यात अपयशी ठरली आहेत.

पंतप्रधानांनी म्हटले की, गेल्या १२ वर्षांपासून केंद्रात एनडीएचे सरकार आहे आणि देशातील २१ हून अधिक राज्यांमध्ये भाजप किंवा एनडीएची सरकारे विकासाच्या मंत्रासह काम करत आहेत.



त्यांनी काँग्रेसवर लोकशाही संस्था, घटनात्मक प्रक्रिया आणि न्यायव्यवस्थेबद्दल द्वेष पसरवण्याचा आरोप केला. मोदी म्हणाले की, काँग्रेस इतकी निराशेत बुडाली आहे की तिच्याकडे शिवीगाळ आणि अश्लाघ्य भाषेशिवाय कोणताही अजेंडा उरलेला नाही.

त्यांनी अलीकडील निवडणूक निकालांचा उल्लेख करत म्हटले की, पुडुचेरीमध्ये सलग दुसऱ्यांदा एनडीए सरकार स्थापन झाले आहे. आसाममध्ये तिसऱ्यांदा एनडीएला जनादेश मिळाला आहे आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपला प्रथमच इतका मोठा पाठिंबा मिळाला आहे. त्यांनी म्हटले की, हे निकाल देशातील युवक, महिला, शेतकरी, गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या मनोवृत्तीचे दर्शन घडवतात तसेच भारतातील जनता स्थैर्य इच्छित असल्याचा संदेश देतात.मोदी म्हणाले की, देशाच्या जनतेला स्पीड पाहिजे, स्कॅम नाही, सोल्यूशन पाहिजे आणि राष्ट्रनीती असलेले राजकारण पाहिजे. त्यांनी म्हटले की, आज संपूर्ण देश भाजपच्या राष्ट्रनीतीसोबत खांद्याला खांदा लावून चालत आहे.

पंतप्रधानांनी पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये भाजपच्या विस्ताराचाही उल्लेख केला. त्यांनी म्हटले की, एकेकाळी बंगालमध्ये भाजपचे फक्त तीन आमदार होते, पण आज तेथे भाजपचे सरकार आहे. त्यांनी हेही म्हटले की, केरळमध्ये भाजपची ताकद सातत्याने वाढत आहे आणि भविष्यात तेथेही भाजप-नेतृत्वाखालील आघाडी बहुमताचा आकडा पार करेल.मोदी म्हणाले की, १० मे ही तारीख ऐतिहासिक आहे कारण १८५७ मध्ये याच दिवशी स्वातंत्र्य संग्रामाची पहिली ठिणगी पडली होती, ज्याने पुढे जाऊन इंग्रजी सत्तेच्या बेड्या तोडल्या. त्यांनी म्हटले की, शौर्य आणि सामर्थ्याचा हाच वारसा देशाची सर्वात मोठी ताकद आहे. पंतप्रधानांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या वर्धापनदिनाचाही उल्लेख केला आणि सांगितले की, ते गुजरातमधील सोमनाथ येथे मंदिर पुनर्निर्माणाच्या ७५ वर्षपूर्ती समारंभात सहभागी होणार आहेत.

# श्री रामभाऊ (आबा) मुरूमकर यांना 'दैनिक लोकनेता' कडून वृक्षमित्र पुरस्कार २०२६ प्रदान

# पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांच्या हस्ते सन्मान

# सामाजिक,धार्मिक व पर्यावरण क्षेत्रातील कार्याचा गौरव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जामखेड । सुनिल पुलवळे**

सामाजिक, पर्यावरण आणि जनजागृती क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने कार्य करणारे वृक्षमित्र श्री रामभाऊ (आबा) मुरूमकर यांना 'दैनिक लोकनेता' यांच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षमित्र पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. हा मानाचा पुरस्कार पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, जगप्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ यांच्या हस्ते दि. १० मे रोजी परळी वैजनाथ येथे आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे साकत गावासह संपूर्ण पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



वनविभागात तब्बल ३७ वर्षे प्रामाणिक सेवा बजावल्यानंतर निवृत्त झालेले रामभाऊ (आबा) मुरूमकर यांनी निवृत्तीनंतरचे संपूर्ण आयुष्य समाजसेवा, पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धनासाठी समर्पित केले आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरे हा संदेश त्यांनी केवळ शब्दांत नाही, तर आपल्या प्रत्यक्ष कृतीतून जिवंत ठेवला आहे.

साकत परिसरातील मुरूमकर स्मशानभूमी, नदीपात्र किनारा तसेच दलितवस्ती स्मशानभूमी परिसरात त्यांनी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली. केवळ झाडे लावून थांबण्याऐवजी त्या वृक्षांचे संगोपन, नियमित पाणीपुरवठा, मशागत आणि संरक्षण करून त्यांनी ओसाड व उजाड परिसर हिरवागार नंदनवनात परिवर्तित केला. आज या परिसरात विविध वृक्षांची दाट सावली निर्माण झाली असून, परिसर शांत, स्वच्छ आणि निसर्गरम्य बनला आहे.

पर्यावरण संवर्धनाबरोबरच पक्षी संवर्धनाकडेही त्यांनी विशेष लक्ष दिले आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांना पाण्याची कमतरता भासू नये म्हणून त्यांनी विविध ठिकाणी पाणवठे तयार केले आहेत. मातीची भांडी, टाक्या आणि छोट्या पाण्याच्या भांड्यांमध्ये नियमित स्वच्छ पाणी उपलब्ध करून दिल्यामुळे चिमण्या, कबुतरे, कावळे तसेच इतर पक्ष्यांना मोठा आधार मिळत आहे. त्यामुळे परिसरातील जैवविविधतेतही मोठी वाढ झाली आहे.

रामभाऊ मुरूमकर हे साकत गावातील सामाजिक, धार्मिक आणि पर्यावरण क्षेत्रातील सक्रिय व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. गावाच्या विकासासाठी आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये ते नेहमी अग्रेसर राहिले आहेत. गरजू नागरिकांना मदतीचा हात देणे, सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे आणि गावातील उपक्रमांना आर्थिक तसेच प्रत्यक्ष सहकार्य करणे यामध्ये त्यांचा नेहमीच मोठा सहभाग राहिला आहे.

साकत गावातील अखंड हरिनाम सप्ताह, भजन-कीर्तन, धार्मिक कार्यक्रम तसेच पंढरपूर दिंडी सोहळ्याच्या आयोजनामध्ये त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय मानले जाते. दिंडीतील वारकऱ्यांसाठी भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच संपूर्ण नियोजनामध्ये ते स्वतः पुढाकार घेतात. त्यामुळे गावातील धार्मिक आणि सामाजिक परंपरा अधिक मजबूत होण्यास मदत झाली आहे.

यासोबतच गावातील स्वच्छता अभियान, वृक्षलागवड, स्मशानभूमी सुशोभीकरण, युवकांना सामाजिक कार्यासाठी प्रेरित करणे आणि ग्रामस्थांना विविध विषयांवर मार्गदर्शन करणे अशी अनेक कामे ते सातत्याने करत आहेत. त्यांच्या निस्वार्थ, प्रामाणिक आणि लोकहिताच्या कार्यामुळे साकत गावात त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना निर्माण झाली असून, अनेक युवक त्यांना प्रेरणास्थान मानत आहेत.

त्यांच्या या उल्लेखनीय सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याचा गौरव म्हणून प्रदान करण्यात आलेला वृक्षमित्र पुरस्कार २०२६ हा संपूर्ण साकत गावासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. पंचक्रोशीत त्यांनी निर्माण केलेली वृक्षमित्र ही ओळख आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये 'दैनिक लोकनेता'चे संपादक व संपूर्ण पत्रकार टीम, मा. श्री. प्राचार्य श्रीराम मुरूमकर, प्रमोद मुरूमकर, प्रतीक मुरूमकर, नागराज मुरूमकर, अमोल पुलवळे तसेच पत्रकार सुनिल पुलवळे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. पुरस्कारप्राप्तीनंतर श्री रामभाऊ (आबा) मुरूमकर यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## शेलोडी जवळ अज्ञात वाहनाची दुचाकीला जोरदार धडक दु चाकी स्वार जागीच ठार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दारव्हा । प्रतिनिधी**

आज रात्री साडे सात ते आठच्या दरम्यान बोरी येथील रहिवासी असलेले संतोष राऊत हे एसटी महामंडळ मध्ये वाहक म्हणून कार्यरत होते. ड्युटी करून दारव्यावरून बोरी येथे दुचाकीने गाडी नंबर(MH29- U5164) परत येत असताना अचानक चार चाकी अज्ञात वाहनाने. संतोष राऊत वय (५० वर्ष ) जोरदार धडक देऊन. तेथून तात्काळ पलायन केल्याची माहिती प्राप्त झाली असून.

पुढील तपास दारव्हा पोलीस स्टेशन अंतर्गत सुरू आहे.

संतोष राऊत एस टी महामंडळ मध्ये कार्यरत असून याही पलीकडे सामाजिक - धार्मिक कार्यात त्यांचे भरपूर योगदान असून

त्यांच्या अचानक अपघाती दुखत घटनेने संपूर्ण



बोरी परिसरामध्ये शोक कडा पसरली असून त्यांना पत्नी दोन मुली एक लहान भाऊ महेश असा परिवार आहे.

## गौरी पौळ हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश


लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । रमेश मुलगीर**

मानवत शहरातील प्रसिद्ध शकुंतला विद्यालय मानवत येथील विद्यार्थिनी गौरी गोविंद पौळ हिने नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात ९४ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

गौरीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन करण्यात येत असून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तिच्या मेहनतीला तसेच पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाला या यशाचे श्रेय दिले जात आहे.

गौरी हिचे वडील गोविंद पौळ यांनी मुलीच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच शाळेचे शिक्षक घनाटे सर, खंदारे सर,



पवार सर आणि पाटेकर मॅडम यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## बि.व्हि.राजेभोसले विद्यालयाचा १०० % निकाल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड,पुणे (बबनराव धायतोंडे)**

दि.८ मे रोजी राज्यातील दहावीचा निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला.यामध्ये दौंड तालुक्यातील खानवटे येथील कै. बी. व्ही. राजेभोसले माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) फेब्रुवारी-मार्च २०२६ बोर्ड परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन करत विद्यालयाची उज्ज्वल परंपरा कायम राखली.

विद्यालयातील कु.प्रणिती संदीप पानसरे हिने ८९.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. सुप्रिया शरद धायतोंडे हिने ८०.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला,तर कु. पायल कालिदास नगरे हिने ७९ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

ग्रामीण भागातही दर्जेदार शिक्षण,शिस्तबद्ध वातावरण आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना ग्रामस्थांनी



व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळतं आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे शिक्षक,पालक आणि ग्रामस्थांकडून अभिनंदन होत आहे.

## पांदण रस्त्याबाबत आमदार बाबुरावजी कदम कोहळीकर यांनी घेतली आढावा बैठक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

आज हदगाव येथे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना अंतर्गत हदगाव व हिमायतनगर या दोन्ही तालुक्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दोन्ही तालुक्यांतील एकही शेत पांदण रस्ता अतिक्रमणाखाली राहू नये तसेच सर्व रस्ते तात्काळ मोकळे करून शेतकऱ्यांना सुरळीत वापरासाठी उपलब्ध करून द्यावेत, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले.

ज्या शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित शेत पांदण रस्ते तात्काळ खुले करण्याचे आदेश देण्यात आले. यासाठी उपविभागीय



अधिकारी, दोन्ही तहसीलदार, पोलीस प्रशासन तसेच भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना कडक सूचना करण्यात आल्या.यावेळी उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्यांचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, भूमी अभिलेख अधिकारी तसेच संबंधित सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करून प्रलंबित अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेमुळे शेतकऱ्यांना शेतीपर्यंत जाण्यास सुलभ मार्ग उपलब्ध होणार असून कृषी विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

## शेतात आग लागून कडबा जळून खाक, शेतकऱ्याचे नुकसान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना । प्रतिनिधी**

शेती करताना शेतकऱ्यांचे कितीही पूर्वनियोजन असले तरी शेतात या ना त्या कारणाने नुकसान होतेच. कारण आपत्कालीन संकटे कोणत्या स्वरूपात शेतकऱ्यांवर ओढवेल हे सांगता येणं शक्य नाही. अशीच एक घटना घनसावंगी तालुक्यातील रांजणी शिवारात घडली. रांजणी शिवारातील शेतात अचानक आग लागून शेतकऱ्याचे कडब्यासह शेतकी अवजार जळून खाक झाले असून शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील शेतकरी सय्यद रशीद अली यांच्या गट क्रमांक २९४ मधील शेतामध्ये रविवारी अचानक कडब्याच्या गंजीला आग लागल्याची भीषण घटना घडली आहे. कडब्याच्या गंजीला लागलेल्या आगीत २ हजार २०० कडब्यासह भुस, पत्रे, औत, सरपन, लोखंडी व प्लास्टीकचे पाईप जळून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. या आगीत जवळपास २ हजार पेक्षा जास्त कडबा पेंडी व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. सय्यद रशीद अली यांनी त्यांच्या कडब्याची वळई करुन ठेवली होती. मात्र अचानक या कडब्याने पेट घेतला. शिवाय वारा असल्याने आग आटोक्यात येणं शक्य नव्हतं. त्यामुळे आग वाढतच गेली.आग लागल्याची माहिती समजताच गावकऱ्यांसह इतर नागरिक आग विझविण्यासाठी घटनास्थळी पोहचले. आग विझविण्याचा बराच प्रयत्न केला गेला. मात्र, आगीचा भडका अधिकच वाढला व शेतात लागलेली आग विझविणे शक्य झाले नाही. पाहता पाहता या आगीत सुमारे २ हजार पेक्षा जास्त कडबा पेंडी व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. या आगीत सय्यद रशीद अली यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

# निर्भीड पत्रकारितेचा गौरव : दैनिक लोकनेताचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार संजय यलमवाड यांना प्रदान

## पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने व अभिनेत्री मेघना झुझम यांच्या हस्ते परळीत सन्मान

लोकनेता न्युज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड शहरातील सामाजिक कार्यकर्ते, पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल मुलींचे मुखेड शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व दैनिक लोकनेता मुखेड तालुका प्रतिनिधी संजय यलमवाड यांना दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. अल्पावधीतच निर्भीडपणे अन्याय, अत्याचाराविरोधात लेखन करून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.

**परळीत मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा**

दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त परळी वैजनाथ येथील भागवत पॅलेसमध्ये शनिवार, दि. १० मे २०२६ रोजी भव्य पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने (जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ), दैनिक लोकनेताचे मुख्य संपादक ज्ञानेश्वर मुंढे, 'सावित्रीबाई फुले' एकपात्री नाट्यप्रयोग फेम अभिनेत्री सौ. मेघना झुझम, ऋतढ चे संस्थापक डॉ. मयंक गांधी, बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संजय यलमवाड यांना पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने व अभिनेत्री सौ. मेघना झुझम यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या कार्याचा गौरव केला.

**निर्भीड लेखणीतून सामान्यांना न्याय**

संजय यलमवाड यांनी मुखेड तालुका प्रतिनिधी म्हणून जबाबदारी स्वीकारल्यापासून शेतकरी, कष्टकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली. अवैध धंदे, शासकीय योजनांतील गैरव्यवहार, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील अनागोंदी याविरोधात त्यांनी परखड लेखन केले. त्यांच्या बातम्यांची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन अनेक प्रकरणांत पीडितांना न्याय मिळाला. सामाजिक कार्यकर्ता आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष म्हणूनही त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

**सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव**

पुरस्कार जाहीर होताच मुखेड तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातून संजय यलमवाड यांचे अभिनंदन होत आहे. सत्याची कास धरून निर्भीडपणे लेखन करणारे पत्रकार हीच लोकशाहीची खरी ताकद आहे, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या.सत्काराला उत्तर देताना संजय यलमवाड म्हणाले, हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून, मला साथ देणाऱ्या वाचकांचा, अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्वसामान्यांचा आणि दैनिक लोकनेता परिवाराचा आहे. पुढील काळातही सत्य व न्यायासाठी माझी लेखणी अविरत चालू राहील




**सत्कारमूर्ती संजय यलमवाड**

जबाबदारी: दैनिक लोकनेता मुखेड तालुका प्रतिनिधी

सामाजिक कार्य: अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, पीएमश्री जि.प. हायस्कूल मुलीचे, मुखेड

वैशिष्ट्य: अन्यायाविरुद्ध निर्भीड लेखन, सामान्यांच्या प्रश्नांना वाचा

सन्मान: दैनिक लोकनेता 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२६

# लातूर जिल्ह्यातील १० टपाल कार्यालयांमध्ये आधार सेवा उपलब्ध

## नागरिकांनी लाभ घेण्याचे टपाल विभागाचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । शिवाजी निरमनाळे**

भारतीय टपाल विभागाच्या लातूर विभागामार्फत जिल्ह्यातील नागरिकांच्या सोयीसाठी आधार सेवांचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. आता लातूर जिल्ह्यातील प्रमुख १० टपाल कार्यालयांमध्ये नवीन आधार नोंदणी आणि आधार दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन टपाल विभागामार्फत करण्यात आले आहे.

टपाल विभागाच्या या कार्यालयांमध्ये मिळणार सुविधा

लातूर विभागातील अहमदपूर (भ्रमणध्वनी क्र. ७३८७१००४०८), औराद शहाजनी (भ्रमणध्वनी क्र. ९१४५६०१६५२), औसा (भ्रमणध्वनी क्र. ७७५८०७५६११), लातूर जुने रेल्वे स्टेशन (भ्रमणध्वनी क्र. ९३०७३८५११३), चाकूर (भ्रमणध्वनी क्र. ७७४५०११५४७), किल्लारी (भ्रमणध्वनी क्र. ७०५७६००८५०), गांधी चौक लातूर मुख्य टपाल कार्यालय (भ्रमणध्वनी क्र. ७७०९७९७५९६), मुरूड (भ्रमणध्वनी क्र. ७०८३३६५००६), निलंगा (भ्रमणध्वनी क्र. ८७९३७२४९०४) आणि उदगीर (भ्रमणध्वनी क्र. ७७६७८४८६२४) या टपाल कार्यालयांमध्ये आधार केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत. संबंधित केंद्रांच्या नावापुढे दिलेल्या संपर्क क्रमांकावर नागरिक अधिक माहितीसाठी संपर्क साधू शकतात.

या केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना नवीन आधार नोंदणी करणे, आधार कार्डावरील मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, पत्ता बदलणे तसेच बायोमेट्रिक माहिती (ठसे व डोळ्यांचे स्कॅनिंग) अद्ययावत करणे यांसारख्या महत्त्वपूर्ण सेवा प्रदान केल्या जाणार आहेत. विशेषतः ज्या नागरिकांचे आधार जुने झाले आहे किंवा ज्यांना कागदपत्रे अद्ययावत करायची आहेत, त्यांच्यासाठी ही सोय अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.

आधार सेवा घेताना काही तांत्रिक अडचण आल्यास किंवा संबंधित कार्यालयाकडून प्रतिसाद न मिळाल्यास, नागरिकांच्या मदतीसाठी ८२७५००२८०५ हा व्हॉट्सप हेल्पलाईन क्रमांक जारी करण्यात आला आहे. या क्रमांकावर संदेश पाठवून नागरिक आपली समस्या मांडू शकतात.

लातूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आधारशी संबंधित कामांसाठी आपल्या जवळच्या टपाल कार्यालयाशी संपर्क साधून या शासकीय सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर विभागाचे सहाय्यक अधीक्षक (डाकघर) श्रीकांत माने यांनी केले आहे.

भारतीय डाक
India Post

## जावळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनी अंजली संतोष झिरमिरे ८६ % गुण घेऊन उत्तीण



लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील जावळी गावातील जिल्हा परिषद प्रशाला दरवर्षी शंभर टक्के निकाल देणारी शाळा असून या शाळेचा दरवर्षी शंभर टक्के निकाल लागतो. याही वर्षी शाळेचा दहावी बोर्ड चा निकाल शंभर टक्के लागला असून यामध्ये सर्वसामान्य व शेतकरी कुटुंबातून आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सतत अभ्यास करून कुठलीही शिकवणी किंवा शिक्षणाचा वारसा नसताना अंजली संतोष झिरमिरे या विद्यार्थिनीने ८६% गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सावली जिल्हा परिषद शाळेतील शालेय समितीच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षा व शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढली वाढली जाते याकडे सातत्याने लक्ष दिले जात व शालेय समितीच्या माध्यमातून जावळीकरांना आवाहन करण्यात येते की आपल्या विद्यार्थ्याला गावातील जिल्हा परिषद प्रशालेतच शिक्षणासाठी प्रवेश घ्यावा असं यावेळी शालेय समितीच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे. आज दहावी बोर्डात द्वितीय क्रमांक पटकावल्यानंतर अंजली संतोष झिरमिरे या विद्यार्थिनीचा औक्षण करत पेढे भरत हे त्वचेत सत्कार संपन्न झाला..

अहेमद पटेल ,राजकुमार ठमके,विठ्ठल थोरात ,तुळशिराम आळणे,सतिष आळणे,बाळु कांबळे ,शाहुराज कांबळे ,महेबुब पटेल ,सद्दाम पटेल ,अलिम पटेल ,दादा सय्यद ,आमोल सातपुते ,सह जावळी ग्रामस्थ उपस्थित होते

## गोकुळवाडीच्या भूमिपुत्राचा महाराष्ट्र पोलीस दलात मानाचा ठसा

# मारुती शिरबरतळ यांची PSI पदी निवड; गावात भव्य नागरी सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संजय यलमवाड**

तालुक्यातील गोकुळवाडी गावचे सुपुत्र तथा कष्टकरी कुटुंबातील होतकरू युवक श्री. मारुती रामदास शिरबरतळ यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात 'पोलीस उपनिरीक्षक' (PSI) पदाला गवसणी घालत गावासह संपूर्ण तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गोकुळवाडी येथे भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यास आमदार तुषार राठोड यांनी प्रमुख उपस्थिती लावून मारुती शिरबरतळ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी त्यांनी मारुती यांच्या यशामागील संघर्ष, मेहनत आणि जिद्दीचे कौतुक करत शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या अशा ध्येयवेड्या तरुणांमुळे समाजाचा गौरव वाढतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी मारुती हे प्रेरणास्थान आहेत, असे गौरवोद्गार काढले.



आमदार तुषार राठोड यांनी पुढे बोलताना, मारुती शिरबरतळ यांनी आपल्या कर्तृत्वाने गोकुळवाडीचे नाव महाराष्ट्र पोलीस दलात अभिमानाने कोरले आहे. त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस माझ्याकडून आणि संपूर्ण मतदारसंघाकडून मनःपूर्वक शुभेच्छा, असे सांगितले.या सत्कार सोहळ्यास गुरुवर्य महंत विशुद्धानंदजी महाराज, तहसीलदार विकास बिरादार, भाजपा विधानसभा प्रमुख खुशालराव पाटील उमरदरीकर, पंचायत समिती सभापती लक्ष्मणराव पाटील खैरकेकर, भाजपा जिल्हा चिटणीस किशोरसिंह चौहान, गणेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष बोनलेवाड, पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड, भाजपा तालुका ओबीसी अध्यक्ष शिवा आलेवार बेळीकर, नगरसेवक पंडित पाटील बेळीकर, धनंजय कोडगिरे, शिवाजी राठोड, पांडुरंग पाळेकर, सरपंच मोरे, महेश सावकार चौधरी, गणेश आंबेकर, पवन शिरबरतळ यांच्यासह ग्रामस्थ, माता-भगिनी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मारुती शिरबरतळ यांच्या यशामुळे गोकुळवाडी गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या कर्तृत्वामुळे ग्रामीण भागातील अनेक तरुणांना नवी प्रेरणा मिळत आहे.

## जावळी जिल्हा परिषद प्रशाला शाळेची विद्यार्थिनी श्रद्धा हनुमंत मुळे ८५.६०% गुण घेत उत्तीण

### श्रद्धा मुळे यांनी दहावी बोर्ड मध्ये ८५.६०% गुण घेत उत्तीर्ण झाल्याने आज परिवाराच्या वतीने सत्कार संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**



औसा तालुक्यातील जावळी येथील शेतकऱ्याची मुलगी श्रद्धा हनुमंत मुळे या विद्यार्थिनींने जावळी येथील जिल्हा परिषद प्रशालेत दहावी बोर्ड परीक्षा दिली होती परीक्षेचा आज निकाल लागला या निकालामध्ये श्रद्धा मुळे यांनी

८५.६०% गुण घेत शाळेत तृतीय क्रमांक मिळवला.. लहानपणापासूनच श्रद्धाला अभ्यासाची खूप आवड आहे श्रद्धा चे वडील शेतकरी असल्याने कुठलीही शिकवणी नसताना व घरी शैक्षणिक वारसा नसताना श्रद्धा ने आपल्या अभ्यासाच्या जोरावर व हिमतीने अहोरात्र अभ्यास करून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करत शाळेत तिसरा क्रमांक पटकावला त्यानिमित्त आज श्रद्धा मुळे हिचा सत्कार करण्यात आला यावेळी महिलांनी श्रद्धाला औक्षण करत पेढे भरवत दहावी उत्तीर्ण झाल्याबद्दल कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी श्रद्धा मुळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की यापुढेही माझ्या शेतकरी आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी खूप मेहनत घेऊन अभ्यास करून शासकीय सेवेत सामील होन्याच माझे स्वप्न असल्याचं बोलून दाखवले यावेळी.

श्रद्धा ची आई सुरेखा हनमंत मुळे ,वडील हणमंत मुळे सह काका रामेश्वर मुळे ,सुग्राव मुळे ,संजय मुळे ,नागोराव मुळे ,हरिबा मुळे ,अंकुश मुळे ,शाहुराज लोंढे ,सुग्रिव लोंढे ,तानाजी भोसले ,दयानंद आनसरवाडे ,संतोष झिरमीरे ,अहेमद पटेल ,बाळु कांबळे ,विशाल साळुंके,सह जावळी ग्रामस्थांनी शुभेच्छा श्रद्धा मुळे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

## जिद्द,मेहनत आणि कर्तृत्वाचा राज्यस्तरीय गौरव; सतीश सुरेश बेतावर यांना राज्यस्तरीय युवा उद्योजक पुरस्कार

### दै.लोकनेता परिवाराकडून भव्य सन्मान; युवकांसाठी ठरले प्रेरणास्थान!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । पवन देरकर**

अथक मेहनत, प्रामाणिकपणा आणि जिद्दीच्या जोरावर व्यवसाय क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे युवा उद्योजक सतीश सुरेश बेतावर यांना दैनिक लोकनेता परिवाराच्या वतीने प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय युवा उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या संघर्षमय प्रवासाला आणि कर्तृत्वाला मिळालेला हा मानाचा मुजरा मानला जात आहे.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभारी घेत स्वतःच्या हिमतीवर यशाचे शिखर गाठणाऱ्या सतीश बेतावर यांनी आपल्या कार्यातून युवकांसमोर आदर्श निर्माण केला आहे. व्यवसायात प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि रोजगार निर्मितीची सकारात्मक भूमिका निभावत त्यांनी समाजात वेगळी छाप निर्माण केली आहे.



दैनिक लोकनेता परिवाराने त्यांच्या कार्याची दखल घेत हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान केला. हा पुरस्कार स्वीकारताना सतीश बेतावर यांनी आपल्या यशाचे श्रेय कुटुंबीय, सहकारी आणि जनतेच्या प्रेमाला दिले.

त्यांच्या या गौरवामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. युवकांनी संघर्षाला घाबरू नये, मेहनतीच्या जोरावर यश नक्की मिळते, हे सतीश बेतावर यांच्या यशोगाथेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# SC आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात तीव्र संताप : उपविभागीय अधिकारी भूम यांच्यामार्फत राज्याच्या मुख्य सचिवांना निषेध निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणासंदर्भात सुरू असलेल्या हालचालींविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) व रिपब्लिकन सेनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी भूम यांच्यामार्फत राज्याचे मुख्य सचिव,यांना निषेध निवेदन देण्यात आले.




या निवेदनामध्ये राज्य सरकार दलित समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संविधानाने अनुसूचित जाती समाजाला दिलेले आरक्षण हे संपूर्ण समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय उन्नतीसाठी असून, त्याचे उपवर्गीकरण करणे म्हणजे संविधानिक हक्कांवर आघात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांच्या विरोधात शासनाची भूमिका असल्याचा आरोप करत, आरक्षणाचे वर्गीकरण करून समाजाचे विभाजन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसताना त्यावर आधारित निर्णय प्रक्रिया राबविणे हे लोकशाही व पारदर्शकतेच्या तत्वांच्या विरोधात असल्याचे सांगण्यात आले. शासनाने समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ जनतेसमोर जाहीर करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांनी शासनाने डउ आरक्षण उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी अशी मागणी केली.यावेळी रिपब्लिकन सेनेचे भुम तालुकाध्यक्ष मुकुंद लगाडे यांनीही शासनाच्या निर्णयाचा तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी निवेदनावर महावीर गायकवाड जिल्हा कार्याध्यक्ष, बाबासाहेब ओव्हाळ, जिल्हा उपाध्यक्ष,सुभाष जावळे - रिपब्लिकन सेना ता.सरचिटणीस, ड बंडू पोळ,दामू लोहकरे, पंचशीलगायकवाड.ता.संघटक, सारिपूत भोसले,पप्पू भालेराव,अंकुश थोरात समता सैनिक दल ता.अध्यक्ष, चंद्रकांत माळी माजी नगरसेवक,नंदकुमार ओव्हाळ,भाऊ जावळे,नारायण मस्के,लक्ष्मण जावळे,प्रशांत शिंदे,संदीप भोसले,,ड.दयानंद व्ही. धेंडे आदिंची उपस्थिती होती.

# शिक्षण क्षेत्रातील समर्पित कार्याचा गौरव

# सौ.स्वप्ना विश्वनाथ गुरुपवार यांना महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । कृष्णा पाटील हडपकर**

समाजाच्या जडणघडणीत शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देत त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणारा शिक्षक हा खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माता असतो. अशाच आपल्या ज्ञान, संस्कार, शिस्त आणि समर्पित कार्याच्या बळावर विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल घडविणाऱ्या शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सिडको नवीन नांदेड येथील कर्तव्यदक्ष व आदर्श शिक्षिका सौ. स्वप्ना विश्वनाथ गुरुपवार यांना दैनिक लोकनेता वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय सन्मानामुळे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



सौ. स्वप्ना गुरुपवार या गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न देता त्यांच्यात संस्कार, आत्मविश्वास, शिस्त, सामाजिक जाणीव आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. शिक्षण हे फक्त गुण मिळविण्याचे साधन नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे, या विचाराने त्यांनी आपल्या अध्यापन कार्याला वेगळी दिशा दिली आहे.

त्यांच्या अध्यापन पद्धतीत नेहमीच नाविन्य, सुस्पष्टता आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन दिसून येतो. कठीण विषयही सहज आणि सोप्या भाषेत समजावून सांगण्याची त्यांची शैली विद्यार्थ्यांना विशेष भावते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण झाली असून अनेक विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत आहेत. केवळ अभ्यासच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या मानसिक, नैतिक आणि सामाजिक विकासासाठीही त्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

गरीब, होतकरू आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. अनेक विद्यार्थ्यांना स्वतः मार्गदर्शन करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे, त्यांच्या पालकांशी सतत संवाद ठेवणे आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी झटणे हे त्यांच्या कार्याचे विशेष वैशिष्ट्य मानले जाते.

शाळेतील विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढावी, विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना रुजावी यासाठी त्यांनी अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये यश संपादन केले आहे.

दैनिक लोकनेता वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राज्यभरातील शिक्षण, समाजकारण, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत सौ. गुरुपवार यांना महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या प्रदीर्घ सेवाभावी कार्याची आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या निष्ठेची पोचपावती असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. त्यांच्या या यशामुळे शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

एक चांगला शिक्षक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करून यशाचा मार्ग दाखवतो, असे म्हटले जाते आणि सौ. स्वप्ना गुरुपवार यांनी आपल्या कार्यातून हे सिद्ध करून दाखवले आहे. विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम, शिक्षणाविषयीची तळमळ आणि समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची वृत्ती यामुळे त्या आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

त्यांच्या या उल्लेखनीय सन्मानामुळे नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला असून भविष्यातही त्या अशाच निष्ठेने विद्यार्थ्यांचे भविष्य घडवत राहतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या कार्याला भविष्यातही अशाच अनेक सन्मानांनी गौरविण्यात यावे आणि त्यांच्या हातून अधिकाधिक विद्यार्थी घडावेत, अशा भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहेत.

## जेष्ठ पत्रकार शेषेराव कंधारे यांचा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने गौरव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील धुप्पा येथील जेष्ठ पत्रकार तथा दैनिक लोकपत्रचे नायगाव तालुका प्रतिनिधी शेषेराव लक्ष्मण कंधारे यांचा दि.१० मे रोजी बिड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जगप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने,अभिनेत्री मेघना झुझूम,बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे,डॉ.मयंक गांधी (संस्थापक ऋतढ),जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात,जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहेमान, पोलीस निरीक्षक नाचेन, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते शाल.पुष्पहार सन्मान चिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

दैनिक लोकपत्रचे नायगाव तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले शेषेराव कंधारे यांनी गेल्या अठरा वर्षापासून ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवत पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे.

पत्रकार शेषेराव कंधारे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत दैनिक लोकनेता परिवाराच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## निळकंठ जाधव यांना दैनिक लोकनेताच्या वतीने उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान.

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील मौजे मुकासदरा येथील निळकंठ नारायण जाधव हे अल्पावधीतच निर्भिड पणे अन्याय, अत्याचारा विरोधात लेखन करून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून दिला आहे. यांच्या कार्याची दखल घेऊन दैनिक लोकनेताने यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त परळी वैजनाथ येथील अनिल भागवत पॅलेस मध्ये मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात दैनिक लोकनेताच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला दि १० मे २०२६ रोजी परळी वैजनाथ येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने (जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ), ज्ञानेश्वर मुंढे ( मुख्य संपादक दैनिक लोकनेता बीड), सौ. मेघना झुझम (अभिनेत्री - सावित्रीबाई फुले एकपात्री नाट्यप्रयोग फेम पुणे), डॉ. मयंक गांधी (संस्थापक ऋतढ), रावसाहेब घुगे (संस्थापक बाप आयटी कंपनी) इत्यादी मान्यवरांच्या हस्ते इतर व्यक्ती बरोबर समाजभूषण निळकंठ नारायण जाधव यांनाही अभिनेत्री सौ. मेघना झुझम यांच्या हस्ते.उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. सदर पुरस्काराबद्दल निळकंठ जाधव यांची सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

## मातृदिन विशेष अध्यात्मिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुसद । प्रतिनिधी**

ब्रह्मकुमारी सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेला मातृदिन विशेष अध्यात्मिक कार्यक्रम अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला . या कार्यक्रमाला शहरातील विविध धर्मीय महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तसेच पुसद नगर परिषदेतील नगरसेवक महिला उपस्थित होत्या. संपूर्ण कार्यक्रमात अध्यात्म ,संस्कार आणि मातृशक्तीचा गौरव अनुभवायला मिळाला.ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ललिता दीदी रामटेकच्या उपस्थित होत्या तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ.चव्हाण मॅडम तसेच सौ. आसेगावकर प्रा.सुनिता राठोड या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व ईश्वरीय गीताने करण्यात आली. उपस्थित महिलांनी मातृत्वाचे महत्त्व कुटुंबातील आईची भूमिका आणि संस्कारक्षम समाज निर्मितीत महिलांचे योगदान अत्यंत मोलाची असते. असे प्रतिपादन ब्रह्मकुमारी सेंटर स्थापिका आशा दीदी यांनी केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक व आध्यात्मिक उपक्रम राबविले जातात कार्यक्रमासाठी विशेष उपस्थित राहिलेल्या ललिता दीदी यांनी महिलांना आईच्या प्रेमाची महती अतिशय प्रभावी शब्दात सांगितले आईचे प्रेम निस्वार्थ असते आणि आईचे स्वरूप हे नवदुर्गा समान शक्तीचे प्रतीक आहे असे सांगत त्यांनी मातृ शक्तीचे महत्त्व अधोरेखित केले त्यांच्या प्रेरणादायी विचाराने उपस्थित महिला भारावून गेल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ब्रह्मकुमारी सेंटर मधील सर्व महिलांनी अथक परिश्रम घेतले तसेच शारदा दीदी आणि रोमादिदी यांनी संस्थेच्या सर्व कामकाजात सक्रिय सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आशा दीदी यांच्या प्रेरणेतून संपूर्ण कार्यक्रम सुंदर रित्या पार पडला. अशाप्रकारे कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व महिलांना ईश्वरीय संदेश व प्रसाद देण्यात आला मातृशक्तीचा गौरव करणारा आणि आध्यात्मिक मूल्याची जाणीव करून देणारा हा कार्यक्रम उपस्थितिसांसाठी प्रेरणादायी व अविस्मरणीय ठरला शेवटी सर्व उपस्थित महिलांचे आभार मानण्यात आले.

# गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाच्या दुरवस्थेविरोधात संताप;आयसीयू व तज्ज्ञ डॉक्टरांची जोरदार मागणी

## किनवट तालुक्यात सर्पदंशाचा कहर; अवघ्या ४८ तासांत ४ जणांचा मृत्यू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

किनवट तालुक्यात सर्पदंशाच्या घटनांनी भीषण स्वरूप धारण केले असून, अवघ्या दोन दिवसांत चार निष्पाप जीवांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण तालुका हादरून गेला आहे. ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, उपचाराअभावी होणाऱ्या मृत्यूंमुळे गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातील आंदबोरी (चि.) येथील शेतकरी केरबा रावजी गारोळे (वय ५७) यांचा शनिवारी गोठ्यात काम करत असताना विषारी साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. ग्रामस्थांनी तातडीने उपचारासाठी
हालचाली केल्या, मात्र योग्य व वेळेवर उपचार न मिळाल्याने त्यांचा जीव वाचू शकला नाही.



याआधी पार्टी खुर्द येथील युवा शेतकरी राम जगन्नाथ इजारे (वय ३५) यांचाही शेतात मोटार सुरू करण्यासाठी गेले असताना विषारी सर्पदंशाने मृत्यू झाला होता. राम इजारे हे शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे संपूर्ण गाव हळहळले.

त्याचवेळी गोकुळनगर येथे घडलेली घटना तर संपूर्ण तालुक्याच्या चटका लावणारी ठरली. चिमुकल्या सई मनाला
सृष्टी व सई दिलीप मुंगल
दिलीप मुंगल (वय ३.६) आणि सृष्टी दिलीप मंगल (वय ५.६) या दोन निष्पाप बहिणींना विषारी सापाने दंश केला.

कुटुंबीयांनी जीवाच्या आकांताने उपचारासाठी धावपळ केली, मात्र योग्य सुविधा उपलब्ध नसल्याने दोन्ही बहिणींना आपला जीव गमवावा लागला. या घटनेनंतर ग्रामीण भागात भीती आणि संतापाचे वातावरण अधिक तीव्र झाले आहे. गोकुंदा रुग्णालय म्हणजे रेफर सेंटर?सततच्या मृत्यूनंतर गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयातील ढिसाळ व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत
आहे. गंभीर रुग्णांना प्राथमिक उपचारानंतर नांदेड, आदिलाबाद किंवा यवतमाळ येथे रेफर केले जात असल्याने अनेक रुग्णांचा जीव प्रवासातच जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. करोडो रुपयांचा निधी खर्चुन उभारलेला दवाखाना जर वेळेवर उपचार देऊ शकत नसेल, तर या यंत्रणेचा उपयोग तरी काय? असा संतप्त सवाल किनवट पंचायत समितीचे माजी सभापती गजानन कोल्हे पाटील यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी आरोग्य प्रशासनावर जोरदार टीका करत गोकुंदा रुग्णालयात तातडीने अत्याधुनिक
सुविधा उपलब्ध करण्याची मागणी केली.

आमदार भीमराव केराम यांच्याकडे नागरिकांची धाव
सर्पदंशाच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आमदार भीमराव केराम यांनी या प्रश्नात वैयक्तिक लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे. गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात अद्ययावत आयसीयू विभाग, व्हेंटिलेटर सुविधा, अँटी-स्नेक व्हेनम औषधांचा पुरेसा साठा आणि तज्ज्ञ डॉक्टरांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांचे म्हणणे आहे की, रुग्णालयात बंद पाहिजेत. अवस्थेतील उपकरणे सुरू झाली पाहिजेत. डॉक्टर आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध झाले अन्यथा
गरीब शेतकरी, मजूर आणि निष्पाप बालकांचे जीव असेच जात राहतील.

इशारा प्रशासनाविरोधात आंदोलनाचा
सर्व घटनांची नोंद किनवट पोलीस ठाण्यात य
जर तातडीने गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात आयसीयू आणि सर्पदंश उपचारासाठी सक्षम व्यवस्था उभारण्यात आली नाही, तर संपूर्ण किनवट तालुक्यात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक कराड यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल वाघमारे व बाडगुरे पुढील तपास करत आहेत. मात्र नागरिकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, केवळ पंचनामे आणि आकस्मिक मृत्यूच्या नोंदी करून प्रश्न सुटणार नाही.

ग्रामीण भागात सर्पदंशाच्या घटना वाढत असताना आरोग्य व्यवस्थेतील हलगर्जीपणा आता जीवघेणा ठरत असल्याचे चित्र असून, आता तरी प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल सर्वसामान्य जनता विचारत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933